विना सहकार
नही उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.
नोंदणी क्र.: पी.एन.ए./एच.एस.जी./(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि. २७/१०/१९८९
Email : archananagar.chs @gmail.com

जा. क्र. 2023/24 - 19 दि. 21. 8. 23

प्रति

सर्व सन्माननीय सदस्य

अर्चना नगर सहकारी गृह रचना मर्यादित, पुणे 411 038

विषय : अर्चना नगर सहकारी गृह रचना सोसायटीच्या पुनर्विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (पी एम सी))/ वास्तु विशारद (आर्किटेक्ट) यांची निवड अंतिम करण्याबाबत

माननीय सदस्य

आपल्या संस्थेच्या दिनांक 27 ऑक्टोबर 2022 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतातील मुद्दा क्रमांक ७ एफ नुसार आपण आपल्या सोसायटीच्या प्रस्तावित पुनर्विकासासाठी पीएमसी/आर्किटेक्ट नेमण्याबाबत नियोजन अंतिम केले होते. त्या अनुषंगाने कार्यवाहीसाठी प्रसारित केलेल्या नोटीसला एकूण नऊ इच्छुक पीएमसी/आर्किटेक्ट यांनी प्रतिसाद दिला होता. त्या सर्वांना निविदापूर्व (प्री-बीड मीटिंग) सभेसाठी बोलावण्यात आले होते. प्री बीड मीटिंगमध्ये सोसायटीची सविस्तर भूमिका व संबंधितांकडून असलेली कामाची अपेक्षा विषद करण्यात आली होती व ज्यांची तयारी असेल त्यांनी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (स्वारस्य प्रतिसाद) (इ ओ आय) सादर करण्याचे सुचविले होते. त्यानंतर नऊ पैकी पाच इच्छुक पार्टीने मोहोरबंद लिफाफ्यात त्यांच्या तांत्रिक (टेक्निकल) व व्यावसायिक (कमर्शियल) निविदा (बीड) सादर केल्या.

प्राप्त पाच सीलबंद बीडपैकी तांत्रिक बीडचे लिफाफे उघडून त्यांचे प्रिबीड मध्ये ठरलेल्या निकषांनुसार विश्लेषण करून त्यापैकी खालील तीन स्पर्धक सर्व सभासदांच्या अंतिम विचारार्थ शॉर्टलिस्ट केले आहेत

१. डी डी आर्किटेक्ट्स
२. जनेसिस टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड
३. टॉलर रिडेव्हलपमेंट

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टीसी/१७०७/१९८९-९०
पुणे-४११०३८

तांत्रिकदृष्ट्या शॉर्टलिस्ट केलेल्या निविदाधारकांना सर्वसाधारण सभेच्या सुरुवातीस प्रत्येकी दहा मिनिटात त्यांच्या संस्थेचे प्रोफाइल सादरीकरण करण्यास सुचवण्यात येईल. त्यानंतर मोहोरबंद व्यावसायिक (कमर्शिअल) निविदा सर्वांसमक्ष उघडण्यात येतील. त्यानंतर आवश्यकता भासल्यास / गरजेनुरूप पीएमसी /आर्किटेक्ट निवडीसाठी मतदान घेण्यात येईल. त्यासाठी बैठकीचे नावनोंदणीचे वेळी प्रत्येक सदस्यास एक मतदान चिठ्ठी पुरवण्यात येईल. मतदान प्रक्रिया सुमारे पंधरा मिनिटात पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यानंतर सर्वांसमक्ष मतमोजणी करून अंतिम निर्णय घोषित केला जाईल. या प्रक्रियेद्वारे निवडण्यात आलेल्या पीएमसी / आर्किटेक्ट यांना तदनंतर नियमितपणे कळवण्यात येईल.

वरील उद्देशाने दिनांक 3 सप्टेंबर 2023 रोजी सकाळी दहा वाजता आपल्या सोसायटीची सार्वत्रिक सभा छत्रे सभागृह येथे आयोजित केली आहे. सभा वेळेवर सुरू करण्याच्या दृष्टीने सर्व सभासदांना विनंती आहे की नियोजित वेळेपूर्वी किमान दहा मिनिटे आपण सभागृहात उपस्थित रहावे.

सोसायटी पुनर्विकास प्राथमिक व निवड प्रक्रिया यासाठी केवळ अर्चना नगर सोसायटीच्या सभासदांनाच सदर सभेस उपस्थित राहता येईल. सभेस उपस्थित राहणाऱ्या सदस्यांनी आपले ओळख पत्राची (आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, पासपोर्ट, पॅनकार्ड इ.) ची प्रत सोबत आणावी. जर एखाद्या सभासदाच्या आपल्या सोसायटी मध्येच एकापेक्षा अधिक सदनिका असल्यास त्यांना केवळ एकच मत देण्याचा अधिकार राहील. अर्चना सोसायटी मधील सभासदांची अंतिम यादी सोबत संदर्भासाठी जोडली आहे.

पीएमसी / आर्किटेक्ट निवड प्रक्रियाचा सर्वानुमते बहुमताने निर्णय झाल्यानंतर अल्पोपहार आयोजित केला आहे.

धन्यवाद

प्रशांत भोसले

अध्यक्ष

अर्चना नगर सहकारी गृह रचना संस्था

पुणे 411 038